नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ४ । वर्ष : ४ थे । अंक : २६५ । किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




मंगळवार दि. ०८ सेप्टेंबर २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## महाराष्ट्रात पावसाची हजेरी लागणार? हवामान विभागाकडून ८ सप्टेंबरला मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून पावसाने अपेक्षित जोर धरलेला नाही. अनेक भागांमध्ये पावसाने दडी मारल्याने पिकांवर त्याचा थेट परिणाम झाला असून, काही ठिकाणी पाण्याअभावी पिके करपण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे बळीराजाच्या नजरा आता आभाळाकडे लागल्या असून, दमदार पावसाची प्रतीक्षा कायम आहे.

दरम्यान, शेतकऱ्यांसाठी काहीसा दिलासा देणारा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. ८ सप्टेंबर रोजी राज्यातील विविध भागांत मेघगर्जनेसह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. त्यामुळे पुढील काही तासांत आणि दिवसांत पावसाची हजेरी शेतकऱ्यांना दिलासा देणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

कोकण विभागात ८ सप्टेंबर रोजी पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या सर्व जिल्ह्यांत हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. या भागांत कुठलाही अलर्ट जारी करण्यात आलेला नाही.

उत्तर महाराष्ट्रातही हलक्या पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, नाशिक घाटमाथा आणि अहिल्यानगर या जिल्ह्यांतही मेघगर्जनेसह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याचं हवामान विभागाकडून सांगण्यात आलं आहे.

पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यांत देखील पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. पुणे, कोल्हापूर, सातारा, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांत हलक्या पावसाची शक्यता आहे. काही भागात उष्णता वाढण्याची शक्यता आहे.

मराठवाड्यातील जिल्ह्यांतही पावसाची शक्यता आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांत हलक्या पावसाची शक्यता असल्याचं हवामान विभागाकडून सांगण्यात येत आहे. या भागांत देखील कुठलाही अलर्ट जारी करण्यात आलेला नाही.



विदर्भात कुठलीही पावसाची शक्यता वर्तविण्यात आली नाही. अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम आणि यवतमाळ जिल्ह्यांत कुठलीही पावसाची शक्यता वर्तविण्यात आलेली नाही. काही भागात उष्णता वाढण्याची शक्यता आहे.

## ‘चला शाळेत जाऊया’ अभियानाच्या माध्यमातून गुणवत्तापूर्ण शिक्षणाला प्राधान्य; शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

राज्यातील शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य आहे. त्याचबरोबर शाळांमधून भौतिक सुविधा, संस्कार आणि राष्ट्रभक्तीची जपणूक यासाठी ‘चला शाळेत जाऊया’ हे व्यापक अभियान लोकचळवळीच्या स्वरूपात राबविण्यात येणार असल्याचे प्रतिपादन शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी केले. या अभियानाच्या माध्यमातून शालेय शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकारी सर्व शाळांना ८ आणि ९ सप्टेंबर, २२ आणि २३ सप्टेंबर तसेच ७ आणि ८ ऑक्टोबर रोजी भेट देणार आहेत. यासाठी अधिकाऱ्यांना जिल्ह्यांचे पालकत्व नेमून देण्यात आले असल्याची माहिती त्यांनी दिली. शालेय शिक्षण क्षेत्रातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांसमवेत महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या कार्यालयात सोमवारी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीनंतर मंत्री भुसे यांनी माध्यम प्रतिनिधींसमवेत संवाद साधताना अभियानाबाबत सविस्तर माहिती दिली. या बैठकीस आमदार विक्रम काळे, किरण सरनाईक, जयंत आसगावकर, ज्ञानेश्वर म्हात्रे, महेंद्र दळवी, विभागाचे प्रधान सचिव रंजीत सिंह देओल, आयुक्त सचिंद्रप्रताप सिंह यांच्यासह विभागाचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीत संघटनांच्या प्रतिनिधींनी शिक्षण क्षेत्राशी संबंधित प्रश्न, मागण्या आणि सूचना मांडल्या. मंत्री भुसे



म्हणाले, शालेय शिक्षण विभागाशी संबंधित विविध संघटनांच्या मागण्या आणि सूचनांवर सकारात्मक दृष्टिकोनातून कार्यवाही करण्यात येणार असून, प्रलंबित प्रश्न टप्प्याटप्प्याने मार्गी लावण्यासाठी विभाग कटिबद्ध आहे. संघटनांकडून प्राप्त झालेल्या निवेदनांमधील अनेक विषयांवर विभागाने आधीच कार्यवाही केली असून उर्वरित विषयांवरही सकारात्मक विचार सुरू आहे.

## नाहुली विविध कार्यकारी सेवा सोसायटीला जिल्हा बँकेचे सभासत्व; कर्ज वाटपाचा मार्ग मोकळा

### विधानपरिषद सभापती आमदार प्रा. राम शिंदे यांच्या आदेशाने प्रशासक मंडळाने घेतला निर्णय

**जामखेड (समर्थ गांवकरी)**

नाहुली विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेची नोंदणी सप्टेंबर २०२२ मध्ये झाल्यानंतर तत्कालीन संचालक मंडळाने संस्थेला सभासदत्व न देता कर्जवाटपापासून वंचित ठेवले होते, परंतु बँकेत संचालक मंडळाची मुदत संपल्या मुळे प्रशासक लागल्या नंतर संस्थेचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सचिन घुमरे यांनी विधानपरिषद सभापती राम शिंदे यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला त्यामुळे प्रशासक यांनी संस्थेला सभासद करून कर्ज वाटप करण्यास मंजुरी दिली.

प्रशासक मंडळाच्या या निर्णयामुळे नाहुली परिसरातील शेतकरी आणि सभासदांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. सोसायटीला जिल्हा बँकेचे सभासत्व मिळावे आणि कर्ज वाटपाची परवानगी मिळावी यासाठी आमदार प्रा. राम शिंदे यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले. त्यांच्या खंबीर पाठपुराव्यामुळेच संस्थेला ही मंजुरी मिळाली आहे. बँकेकडून कर्ज वाटपाची परवानगी मिळाल्यामुळे आता नाहुली सोसायटीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना पीक कर्ज, मध्यममुदती कर्ज आणि इतर कृषीपूरक योजनांसाठी अत्यंत सुलभतेने अर्थसाहाय्य उपलब्ध होणार आहे.

या महत्त्वपूर्ण यशामुळे नाहुली




लवकरच विधानपरिषद सभापती आमदार राम शिंदे यांच्या उपस्थितीमध्ये नाहुली गावातील व परिसरातील शेतकऱ्यांना कर्ज वाटपाचा कार्यक्रम घेऊन चेक वितरण करण्यात येणार आहेत.

सोसायटीच्या संचालक मंडळाने व संस्थेचे संस्थापक चेअरमन सचिन घुमरे यांनी विधानपरिषद सभापती आमदार प्रा. राम शिंदे यांचे विशेष आभार मानले आहेत. तसेच सर्व स्तरांतून सोसायटीचे अभिनंदन केले जात आहे. जिल्हा बँकेने दाखवलेल्या विश्वासामुळे संस्थेच्या माध्यमातून सभासदांना अधिकाधिक पारदर्शक आणि जलद सेवा देण्याचा आमचा मानस आहे, असा विश्वास सोसायटीच्या व्यवस्थापनाने व्यक्त केला आहे.

## इजिप्तच्या आकाशात भारताचा ‘सारंग’ थरार! ‘डॉल्फिन लीप’सह नव्या कसरतीने जगाचे लक्ष वेधणार

**नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)**



भारतीय वायुसेनेच्या शौर्याची आणि स्वदेशी एरोस्पेस क्षमतेची झलक आता इजिप्तच्या आकाशात पाहायला मिळणार आहे. भारतीय वायुसेनेची प्रसिद्ध ‘सारंग’ हेलिकॉप्टर एरोबॅटिक टीम दुसऱ्या ‘एल अलामीन इंटरनॅशनल एअर शो’मध्ये सहभागी होण्यासाठी इजिप्तमध्ये दाखल झाली आहे. ८ ते १० सप्टेंबर २०२६ दरम्यान एल अलामीन इंटरनॅशनल एअरपोर्टवर हा आंतरराष्ट्रीय एअर शो आयोजित करण्यात आला आहे. या शोमध्ये सारंग टीम आपल्या थरारक हवाई कसरती सादर करणार आहे.

सारंग टीमच्या प्रात्यक्षिकांमध्ये यावेळी विशेष आकर्षण ठरणार आहे ते तिच्या प्रसिद्ध ‘डॉल्फिन लीप’ या कसरतीचे. याशिवाय टीमकडून ‘स्पॉट स्टॉल टर्न’ ही नवीन हवाई कसरतही सादर केली जाणार आहे. अचूक फॉर्मेशन, अत्यंत कमी अंतरावरून केले जाणारे उड्डाण आणि एकाच वेळी होणाऱ्या समन्वयित हालचालींमुळे सारंग टीमची प्रात्यक्षिके जगभरात विशेष आकर्षणाचे केंद्र ठरतात.

### भरती परीक्षांमध्ये मोठ्या सुधारणा होणार?

## सरकारचा उच्चस्तरीय टास्क फोर्स राज्यभर उमेदवारांशी थेट संवाद साधणार

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

राज्यातील भरती परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक, विश्वासार्ह आणि उमेदवाराभिमुख करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. भरती परीक्षा पद्धतीचा सर्वंकष अभ्यास करून आवश्यक सुधारणा सुचविण्यासाठी शासनाने ४ सप्टेंबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये उच्चस्तरीय टास्क फोर्स गठीत केला आहे. हा टास्क फोर्स राज्यातील सर्व सहा विभागांना प्रत्यक्ष भेट देऊन विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा उमेदवार, पालक, शिक्षक, शैक्षणिक संस्था आणि अन्य संबंधित हितधारकांशी थेट संवाद साधणार आहे. भरती परीक्षांमध्ये गैरप्रकारांना आळा घालणे, परीक्षा प्रक्रियेची सुरक्षा अधिक मजबूत करणे, परीक्षांमध्ये पारदर्शकता आणि विश्वासार्हता वाढवणे तसेच संपूर्ण परीक्षा व्यवस्था उमेदवारांसाठी अधिक सुलभ आणि उत्तरदायी करण्याच्या दृष्टीने या टास्क फोर्सकडून विविध सूचना आणि अभिप्राय जाणून घेतले जाणार आहेत.

## शिर्डीत ‘बीबीएनजी स्काय’ चॅप्टरचा शानदार शुभारंभ

### शिर्डी–कोपरगाव–येवला परिसरातील उद्योजकांसाठी व्यवसायवृद्धीचे नवे व्यासपीठ

**कोपरगांव (समर्थ गांवकरी)**

ब्राह्मण उद्योजकांचे जागतिक स्तरावरील मोठे नेटवर्क असलेल्या बीबीएन ग्लोबल अंतर्गत ‘बीबीएनजी स्काय ’ आयोजन (शिर्डी–कोपरगाव–येवला) चॅप्टरचा भव्य शुभारंभ रविवार, दि. ६ सप्टेंबर २०२६ रोजी शिर्डी येथील अगत्य ग्रो टुरिझम येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

बीबीएनजी ग्लोबल ही संस्था सध्या ३० पेक्षा अधिक देशांमध्ये कार्यरत असून ९० हजारांहून अधिक व्यावसायिक व उद्योजक या नेटवर्कशी जोडले गेले आहेत. या माध्यमातून शिर्डी, कोपरगाव व येवला परिसरातील उद्योजकांना परस्पर व्यावसायिक सहकार्य, मार्गदर्शन व व्यवसायवृद्धीसाठी नवे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.

कार्यक्रमाचे मुख्य वक्ते केंद्रीय एम एस एम एई,बोर्डाचे सदस्य, उद्योग मित्र व बीबीएनजी चे सल्लागार श्री. प्रदीप पेशकार यांनी ‘सरकारच्या धोरणानुसार व्यवसाय करून आपला व्यवसाय दहापट कसा वाढवायचा?’ तसेच उदयोगा करीता ’आर्थिक तरतुद’ या विषयांवर मार्गदर्शन केले. बदलत्या व्यावसायिक वातावरणात शासकीय धोरणांचा प्रभावी वापर, आर्थिक नियोजन आणि व्यवसायवृद्धीचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले.

या सोहळ्यास बीबीएनजी चे संस्थापक अध्यक्ष श्री. श्रीपाद कुलकर्णी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच सरचिटणीस संचालक श्री. अरविंद कोऱ्हाळकर, सहयोगी संचालक (विकास) डॉ. अभिजित चांदे आणि सहयोगी संचालक (वित्त) श्री. महेश देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी ब्राह्मण सभा, कोपरगावचे अध्यक्ष श्री. मकरंद को–हाळकर तसेच ब्राह्मण एकता मंच, शिर्डीचे श्री. धनंजय पाटील उपस्थित होते.

कोपरगाव चॅप्टरच्या पदाधिकाऱ्यांची घोषणा

कार्यक्रमात कोपरगाव चॅप्टरच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांची अधिकृत घोषणा करण्यात आली. चॅप्टर प्रमुख म्हणून गौरव कोऱ्हाळकर, सेक्रेटरी म्हणून अभिषेक कुर्लेकर आणि ट्रेझरर,कोषाध्यक्ष म्हणून नितीन जोशी जोशीज् ट्रेडर्स यांची निवड करण्यात आली. या कार्यकारिणीला चॅप्टरचे पालक (गार्डियन) बाळकृष्ण कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

नव्याने सुरू झालेल्या स्काय चॅप्टरचे वैशिष्ट्य म्हणजे डिजिटल, हर्बल आणि स्पिरिच्युअल यांसह विविध क्षेत्रांतील व्यवसायांचा यात समावेश आहे. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी रिजनल हेड रासिका कुलकर्णी आणि डेव्हलपमेंट कोऑर्डिनेटर डॉ. संदीप चिंचोलीकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

‘नोकरी शोधणारा नव्हे, रोजगार निर्माण करणारा समाज घडवूया’

बीबीएनजी चे संस्थापक अध्यक्ष श्री. श्रीपाद कुलकर्णी यांच्या विचारांनी उपस्थितांना विशेष प्रेरणा मिळाली. केवळ स्वतः व्यवसाय करण्यापुरते मर्यादित न राहता समाजातील प्रत्येक व्यक्तीने व्यवसाय करावा, व्यवसाय वाढवावा, आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे आणि इतरांसाठी रोजगार निर्माण करावा, हा व्यापक दृष्टिकोन त्यांनी मांडला.

## पाणावलेले डोळे, अंगावर शहारे अन् भक्तिरसात तल्लीन सेवेकरी; अकोल्यात रंगला श्रीकृष्ण जन्मोत्सव!

**अकोले (समर्थ गांवकरी)**

श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र, अकोले येथे श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राच्या ३० व्या वर्धापन दिनानिमित्त श्रीकृष्ण जन्मोत्सव अत्यंत भक्तिमय, भावपूर्ण आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. श्रीकृष्ण–सुदामा भेटीचा प्रसंग पाहताना सेवेकऱ्यांचे पाणावलेले डोळे, मथुरा कारागृहातून वसुदेव बाळकृष्णाला घेऊन जात असतानाचा प्रसंग पाहून अंगावर आलेले शहारे आणि स्वामी स्वरांजलीच्या भक्तिमय गीतांनी तल्लीन झालेले सेवेकरी, अशा भावस्पर्शी वातावरणात जन्मोत्सव रंगला.

श्रीकृष्ण जन्माची सुंदर मांडणी, सुदामा भेट तसेच वसुदेवांनी बाळकृष्णाला नदीपात्रातून नेण्याचा प्रसंग हुबेहूब साकारण्यात आला. प्रत्येक पात्रातील जिवंतपणा आणि प्रसंगांची प्रभावी मांडणी उपस्थितांच्या मनाला भावून गेली. सेवेकरी तथा मार्गदर्शक संजूकाका हुजबंद यांच्या कल्पक नियोजनातून आणि अथक परिश्रमातून हा सोहळा साकारला. स्वामी सेवेकरी भजनी मंडळ, संगमनेर यांच्या रसाळ








व भक्तिमय वाणीतून सादर झालेल्या भजनांनी संपूर्ण परिसर स्वामीमय करून टाकला. सुंदर सूत्रसंचालन आणि सेवेकऱ्यांनी कथन केलेले स्वामी मार्गातील अनुभव यामुळे अनेक सेवेकरी भावुक झाले.

या सोहळ्यास आमदार डॉ. किरण लहामटे उपस्थित होते. मध्यरात्री १२.३९ वाजता श्रीमद्भगवद्गीतेच्या १८ व्या अध्यायाचे वाचन झाल्यानंतर ‘गोपाल कृष्ण भगवान की जय’च्या जयघोषाने केंद्राचा परिसर दुमदुमून गेला. त्यानंतर ‘गोविंद बोलो हरी गोपाल बोलो, राधा रमण हरी गोपाल बोलो’ या भक्तिगीतावर सेवेकऱ्यांसह आमदार डॉ. किरण लहामटे यांनीही ताल धरल्याने उत्साहाला उधाण आले. यावेळी बोलताना आमदार डॉ. लहामटे यांनी स्वामी मार्ग हा विश्वास, श्रद्धा आणि भावनेवर आधारित असून सेवेकऱ्यांना आलेल्या अनुभवांमुळे हा मार्ग दिशादर्शक ठरला असल्याचे सांगितले. तसेच स्वच्छता अभियानांतर्गत प्रवरा नदी स्वच्छ करण्यासाठी आणि नदीकाठ स्वच्छ ठेवण्यासाठी अभियान राबवावे, असे आवाहन केले. चिंचपूर येथील शेजुळ मामा यांनी रामायणात वानर, महाभारतात गवळणी व संवगडी, विठ्ठलासोबत वारकरी आणि आता स्वामी समर्थ महाराजांसोबत सेवेकरी म्हणून कार्य करण्याचे भाग्य लाभले असून, त्यावर गुरुमाऊलींचा आशीर्वाद लाभणे हे परमभाग्य असल्याचे सांगितले. संजूकाका हुजबंद यांच्या मार्गदर्शनाखाली महिला सेवेकऱ्यांनी श्रीकृष्ण, राधा, सुदामा, बलराम आदी पात्रे प्रभावीपणे साकारली. संपूर्ण नाट्याचे दिग्दर्शन, नेपथ्य व प्रकाशयोजना स्वप्नील कांडेकर यांनी, तर ध्वनिक्षेपक व्यवस्था सचिन ढेकणे यांनी सांभाळली. सातारा, मुंबई, अहिल्यानगर तसेच अकोले तालुक्यातील कुंभेफळ, निंब्रळ, चितळवेढे यांसह विविध केंद्रांतील मोठ्या संख्येने सेवेकरी उपस्थित होते.

## नगर तालुक्यात तरूणावर जीवघेणा हल्ला ; एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

नेवासा येथील गंभीर गुन्ह्यातील आरोपीच्या जामिनावर सुटकेनंतर जेऊर बायजाबाई (ता. अहिल्यानगर) येथे आयोजित करण्यात आलेल्या सत्कार कार्यक्रमाला विरोध केल्याच्या कारणावरून एका तरूणावर चौघांनी लोखंडी रॉड, चाकू, फायटर तसेच कठीण वस्तूने जीवघेणा हल्ला केल्याची घटना १ सप्टेंबर रोजी रात्री घडली. मयुर मोहन मकासरे (वय ३०, रा. जेऊर बायजाबाई) असे जखमी तरूणाचे नाव आहे.

त्यांच्यावर रूग्णालयात उपचार सुरू असून त्यांनी दिलेल्या जबाबावरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शुभम शरद जाधव, जाँय सुनील वाघमारे, दीपक नानाभाऊ वाघमारे, हर्षद सचिन वाघमारे (सर्व रा. जेऊर बायजाबाई) अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयितांची नावे आहेत.

नेवासा येथील नितीन केंदळे याच्या सत्काराचा कार्यक्रम जेऊर बायजाबाई येथे आयोजित करण्यात आला होता.

केंदळे हा जेलमधून जामिनावर सुटल्याचे सांगत, गावात बाहेरील व्यक्तीच्या सत्काराचा कार्यक्रम घेऊ नये, असे मयुर मकासरे याने शुभम जाधव याला फोनवरून सांगितल्याच्या रागातून मयुर मकासरे यांच्यावर खूनी हल्ला झाल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

# विद्यार्थ्यांचे भविष्य, करिअर, रोजगारक्षम बनविणारे ओजेटी प्रभावी माध्यम : डॉ. परवेझ शेख

## एकता कॉलेजमध्ये ऑन जॉब ट्रेनिंग विषयावर कार्यशाळा संपन्न

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

सर्व विद्यार्थ्यांच्या व्यावहारिक ज्ञानवृद्धीतील बदलत्या गरजा लक्षात घेता,त्यांचे भविष्य, करिअर, रोजगारक्षम अधिक सक्षम बनविणारे ऑन जॉब ट्रेनिंग (ओजेटी)हे प्रभावी माध्यम असल्याचे प्रतिपादन छत्रपती संभाजीनगर येथील लोकसेवा महाविद्यालयाचे इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.डॉ.परवेझ शेख यांनी केले.

सावेडी उपनगरातील तपोवन रोडवरील एकता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय येथे ओजेटी (ऑन जॉब ट्रेनिंग) या विषयावर एकदिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

कार्यशाळेस प्रमुख पाहुणे म्हणून छत्रपती संभाजीनगर येथील लोकसेवा एज्युकेशन सोसायटीचे कला आणि विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लियाकत शेख, उमरगा धाराशिव येथील श्रीकृष्ण महाविद्यालयाचे गणित विभाग प्रमुख डॉ. जगदीश नन्नवरे,कडा आष्टी येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयाचे डॉ.दत्तात्रय बोडखे, लोकसेवा महाविद्यालयाचे इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.डॉ.परवेझ शेख, एकता महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा.राजेंद्र मेहेत्रे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने करण्यात आली. विद्यार्थ्यांना




तपोवन रोडवरील एकता महाविद्यालयात ऑन जॉब ट्रेनिंग विषयावर मार्गदर्शन करताना प्रा.डॉ.परवेझ शेख समवेत डॉ. सलमान पठाण, डॉ. दत्तात्रय बोडखे, डॉ. लियाकत शेख, डॉ. जगदीश नन्नवरे, प्रभारी प्राचार्य राजेंद्र मेहेत्रे आदी (छाया - विजय मते)

मार्गदर्शन करताना लियाकत शेख यांनी ओजेटी म्हणजे काय, त्याचे स्वरूप कसे असते, याबाबत माहिती दिली.

यावेळी श्रीकृष्ण महाविद्यालय उमरगा धाराशिव येथिल गणित विभाग प्रमुख डॉ. नन्नवरे यांनी स्कोप ऑफ ओजेटी इन ऑल फॅकल्टीज या विषयावर आपले विचार मांडले. ओजेटी ची उपयुक्तता केवळ एका विशिष्ट शाखेपुरती मर्यादित नसून विविध विद्या शाखांमध्ये त्याची प्रभावी अंमलबजावणी करता येते.

विद्यार्थ्यांना त्यांच्या विषयाशी संबंधित प्रत्यक्ष अनुभव मिळण्यासाठी ओजेटी महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी कडा (आष्टी) येथील आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय येथील डॉ.बोडखे यांनी इम्पॉर्टंट ऑफ ओजेटी या विषयावर मार्गदर्शन करताना म्हणाले विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सैद्धांतिक ज्ञानासोबतच प्रत्यक्ष कार्यानुभव आवश्यक असतो.

ओजेटी मुळे विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य, आत्मविश्वास आणि व्यावसायिक दृष्टिकोन विकसित होण्यास मदत होते.असे ते म्हणाले. डॉ.शेख यांनी चॅलेंजेस अँड ऑपरटूनिटीस इन ओजेटी या विषयावर मार्गदर्शन केले.ओजेटी राबविताना येणारी विविध आव्हाने तसेच त्यातून निर्माण होणाऱ्या संधी यावर त्यांनी प्रकाश टाकला. विद्यार्थ्यांनी आव्हानांकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहून उपलब्ध संधींचा योग्य उपयोग करावा,असे आवाहन त्यांनी केले.

कार्यशाळेच्या या सत्रात प्रश्नोत्तर व चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. यामध्ये विद्यार्थी व शिक्षकांनी ओजेटी त्याची अंमलबजावणी, विद्यार्थ्यांना होणारे फायदे तसेच रोजगाराच्या संधी यासंदर्भात विविध प्रश्न विचारले. उपस्थित तज्ज्ञांनी प्रश्नांना समर्पक उत्तरे देत विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले.

एकता कॉलेज चे प्रभारी प्राचार्य राजेंद्र मेहेत्रे यांनी रोल ऑफ ओजेटी इन अॅकॅडेमिक या विषयावर मनोगत व्यक्त करताना शैक्षणिक अभ्यासक्रम आणि प्रत्यक्ष कार्यानुभव यांची सांगड घालण्यासाठी ओजेटी ची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. यामुळे विद्यार्थ्यांचे ज्ञान अधिक व्यवहार्य होऊन त्यांच्या रोजगार क्षमतेत वाढ होईल, असे ते म्हणाले.

या कार्यशाळेत

मान्यवरांचे मार्गदर्शन, प्रश्नोत्तर सत्र आणि विचारांची देवाणघेवाण यामुळे एकदिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. कार्यक्रमाचे संयोजन प्रा. के.बी. बडधे, प्रा.एन.एम. पटेल, प्रा.एस. एस.पठाण तर नियोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.एम.ए.नवगिरे, ए.व्हि. गायकवाड आदींनी केले. सूत्रसंचालन प्रा.एच.एस. कासार यांनी केले तर आभार प्रा.आर.टी. तुतारे यांनी मानले.

# गौरी शुगरला तांत्रिक कार्यक्षमतेचा पुरस्कार

## ओंकार शुगर समूहाचा चेन्नईत गौरव

श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)

गाळप हंगाम २०२५-२६ मध्ये उत्कृष्ट तांत्रिक कार्यक्षमता, प्रभावी कारखाना व्यवस्थापन आणि उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल गौरी शुगर अँड डिस्टिलरीज प्रा. लि., बाजोळगा (युनिट क्रमांक १३) यांना दक्षिण भारतीय ऊस व साखर तंत्रज्ञ संघटनेतर्फे तांत्रिक कार्यक्षमतेतील उत्कृष्ट कारखाना कामगिरीचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

चेन्नई येथे झालेल्या संघटनेच्या ५५व्या वार्षिक अधिवेशनात हा पुरस्कार देण्यात आला. ओंकार शुगरचे संचालक ओमराजे बाबुराव बोत्रेपाटील यांनी समूहाच्या वतीने पुरस्कार स्वीकारला. यावेळी युनिट क्रमांक १३चे अधिकारी उपस्थित होते.

श्रीगोंदा = गाळप हंगाम २०२५-२६ मध्ये उत्कृष्ट तांत्रिक कार्यक्षमता,



प्रभावी कारखाना व्यवस्थापन आणि उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल गौरी शुगर अँड डिस्टिलरीज प्रा. लि., बाजोळगा (युनिट क्रमांक १३) यांना दक्षिण भारतीय ऊस व साखर तंत्रज्ञ संघटनेतर्फे तांत्रिक कार्यक्षमतेतील उत्कृष्ट कारखाना कामगिरीचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

चेन्नई येथे झालेल्या दक्षिण भारतीय ऊस व साखर तंत्रज्ञ संघटनेच्या ५५व्या वार्षिक अधिवेशनात हा पुरस्कार देण्यात आला. ओंकार शुगरचे संचालक ओमराजे बाबुराव बोत्रेपाटील यांनी समूहाच्या वतीने पुरस्कार स्वीकारला. यावेळी युनिट क्रमांक १३चे अधिकारी उपस्थित होते.

चेअरमन बाबुराव बोत्रेपाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कारखान्याने उपलब्ध साधनसामग्रीचा योग्य वापर, उत्पादन प्रक्रियेतील कार्यक्षमता, तांत्रिक व्यवस्थापन आणि गुणवत्तापूर्ण उत्पादनात उल्लेखनीय कामगिरी केली.

हा पुरस्कार अधिकारी, कर्मचारी, कामगार आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या सामूहिक प्रयत्नांची पावती असल्याची भावना व्यवस्थापनाने व्यक्त केली.

# चौथ्या श्रावणी सोमवारी सिद्धेश्वराच्या दर्शनाला भक्तांची मांदियाळी

## पुणे,नगर,मुंबई,विदर्भ मराठवाडयासह विविध भागातून शिवभक्तांची उपस्थिती



अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

आज चौथ्या श्रावणी सोमवारी लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीक्षेत्र सिद्धेश्वर,सिद्धेश्वरवाडी पारनेर येथे दर्शनासाठी भक्तांची मंदियाळीच जमली होती.

आज पहाटे ४ वाजता सिद्धेश्वर मंदिरात शिवलिंगावर अभिषेक झाला. ६ वाजता महाआरती झाली. ७ वाजता मंदिर दर्शनाला खुले झाले. सकाळी ९:३० वाजता हभप तुषार महाराज पाबळे यांचे प्रवाचन झाले.दुपारी १ ते २ संगीत भजनाचा कार्यक्रम झाला.भाविक भक्तांनी दिवसभर दर्शन बारिमधून सिद्धेश्वराचे दर्शन घेतले.आलेल्या भाविक भक्तांना ५०० किलोची खिचडी, फरळाचा चिवडा आणि केळीच्या प्रसादाचे वाटप करण्यात आले.यावेळी दिवसभर रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये भाविकांनी चांगले सहकार्य केले.

सिद्धेश्वर भगवान की जय हर हर महादेव गर्जनेमुळे परिसर दुमदूमून गेला.यावेळी भाविकांसाठी सिद्धेश्वर देवस्थान ट्रस्टने पार्किंगची उत्तम सोय केली होती. बारा ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेतल्यानंतर भाविक भक्त श्री सिद्धेश्वराचे दर्शन घेतात. आणि सिद्धेश्वर देवस्थान एक जागृत देवस्थान म्हणून सर्वत्र परिचित आहे. आज या देवस्थानला श्रीसिद्धेश्वराचे दर्शन घेण्यासाठी पुणे नगर, विदर्भ,मराठवाडा, मुंबई यासह महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून भाविक भक्त आले होते. अनेक मान्यवर भाविक भक्तांनी सिद्धेश्वर देवस्थानला भरीव स्वरूपामध्ये देणग्या सुद्धा दिल्या. आलेल्या सर्व भाविकांचे सिद्धेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

**कार्यालय**

**जिल्हा वक्फ अधिकारी, पुणे**

कार्यालयाचा पत्ता-प्लॅटिनम बिल्डींग, पहिला मजला, प्लॉट नंबर ११, मंगळवार पेठ, सिंचन भवन शेजारी, पुणे ४११ ०११.

जा.क्र/जिवअ/पुणे/चौकशी/२०५/२०२६ दि. २९ जुलै २०२६

**(जाहीर प्रगटन)**

**उम्मीद अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये वक्फ संस्थेच्या योग्य प्रशासनाकरीता योजना मंजूर करणेबाबत.**

**वक्फ संस्थेचे नाव व पत्ता :** Madina Masjid, At. Pimpalgaon Joga, Tq. Junner, Dist. Pune (MSBW/PUN/869/2025)

उपरोक्त वक्फ संस्था महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळात नोंदणीकृत असून अर्जदार **श्री. अशपाक शाबुद्दीन मोमीन** यांनी **दि. ३०/१०/२०२५** रोजीच्या अर्जान्वये सदर संस्थेच्या व्यवस्थापनाकरीता महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे प्रारूप योजना दाखल केलेली आहे. प्रारूप योजनेतील तरतुदीनुसार विश्वस्तांचा कार्यकाळ **पाच** वर्षांचा असून व्यवस्थापन समिति निवडीची रीत **समिती सदस्य निवडीची रीत बहुमताने राहील. राजीनामा, बडतर्फी, मृत्यू व अन्य कारणांमुळे पद रिक्त झाल्यास सदर रिक्त पदी उर्वरित व्यवस्थापकीय समिती सदस्यांच्या बहुमताने पद्धतीने नवीन सदस्यांची नियुक्ती करण्यात येईल** अशी आहे. योजनेमध्ये नमूद प्रस्तावित व्यवस्थापन समिती खालीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १. | अशपाक शाबुद्दीन मोमीन | अध्यक्ष |
| २. | आलताब शाबुद्दीन मोमीन | उपाध्यक्ष |
| ३. | शब्बीर गुलाम शेख | सचिव |
| ४. | अजीज अल्ला मोमीन | खजिनदार |
| ५. | इम्रान गुलाम जमादार | सदस्य |
| ६. | सलमान गुलाब शेख | सदस्य |
| ७. | समीर अब्दुल शेख | सदस्य |

सदर प्रारूप योजनेबाबत काही तक्रारी, आक्षेप असल्यास संबंधितांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसाच्या आत, जिल्हा वक्फ अधिकारी, पुणे, प्लॅटिनम बिल्डींग, पहिला मजला, प्लॉट नंबर ११, मंगळवार पेठ, सिंचन भवन शेजारी, पुणे ४११ ०११. येथे आपले म्हणणे दाखल करावे. विहीत वेळेनंतर आक्षेप प्राप्त झाल्यास त्याची दखल घेण्यात येणार नाही. याची दक्षता घ्यावी.

**जिल्हा वक्फ अधिकारी**
**(पुणे)**

**महाराष्ट्र शासन**

**सार्वजनिक बांधकाम विभाग**

कार्यकारी अभियंता, नाशिक विद्युत विभाग यांचे कार्यालय,
२ रा मजला, ग्रीन बिल्डींग, सा. बां. परिसर, उंटवाडी रोड, नाशिक-४२२ ००२.

ई-मेल :- elnashik.eemahapwd.gov.in दूरध्वनी क्र.०२५३-२५७८०१२.

**दरपत्रक सूचना क्र. ०४ सन २०२६-२७**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग, नाशिक दूरध्वनी क्रमांक ०२५३-२५७८०१२ हे खालील बाबीचे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी मुळ उत्पादक अथवा अधिकृत वितरक यांचेकडून दरपत्रक मागवित आहे. सदर दरपत्रक या कार्यालयात दिनांक ०८.०९.२०२६ ते १५.०५.२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत निम्नस्वाक्षरीकार यांचे कार्यालयात सादर करण्यात यावेत.

| Sr | Description and Specification of Item | Unit | Qty | Rate Per Unit (Rs) |
|---|---|---|---|---|
| 1. | Supply Installation Testing Commissioning of 8.0 mtr pole made of Hot-Dip Galvanized Structural steel pole 8.0 metre high decorative Hot-dip GI pole complete with double arm bracket solar panel mounting frame battery support frame base plate and anchor bolts etc. Mild steel mounting plate (300 mm square x 16 mm thick stell IS 2062:2011, Grade E250, with applicable amendments/latest revision with 4 elongated holes 38 x 19 to suit $M^2$ 24 x 800 mm bolts of grade 8.8 at CC180 minimum embedment depth of 750 to 800mm with hot dip galvanized nuts washers. This mounting steel plate along with foundation bolt of suitable size to be used for an ensuring firm grouting into the provided foundation. Decorative base casting fitted to base plate (300 mm base Dia) fitted on Galvanized Iron base(Base casting height 700mm decorative design with intermediate ring casting if necessary access door provided with locking arrangement )with luminaire mounting height 6000 mm from pole base Decorative main structure Hot-dip GI pipe with height of 5750 mm height (outside dia of 114 mm thickness of 5 mm and material of IS- 2062:2011, E250 grade). Decorative Galvanized iron embellishment with die-cast aluminium for Whole Pole. Pole section welded by using high end MIG welding processes. The pole is coated with with -ntique copper/Yellowish shade/as per user requirment colour shade finishing with zince rich primer pure polyster powder coating or epoxy zink phosphate primer finished using envirmentally stable polyurethane based paint with decorative signage of damroo trishul/ahilyadevi holkar symbol/ as per user requirment, providing double arm bracket for erection of double fitting, the double arm pelican mini orna eva bracket is a split constructed type bracket stem decorative GI fabricated double arm upto a height of 1000 mm suitable for mounting 2 x 50 W LED street lights with iron work for Solar pannel sheet metal work consisting of CRC- sheets various sections of iron plates chequered plates rods bars MS pipes etc. for panel board or any other purpose with bending cutting drilling and welding complete erected at the position with necessary materials duly painted with one coat of red oxide and two coats of enamel paint to match the switchgears or per directions by the authority on provided foundation for 8Mtr Height Pole.(Non-CSR) | Each | 197 | |
| 2. | Providing, supplying, installing, testing and commissioning of minimum 200 Wp high-efficiency mono-crystalline silicon Solar PV Module, having minimum 19% module efficiency, complete with tempered solar glass, weather-resistant encapsulant/ backsheet, anodized aluminium frame, IP68 junction box, factory-fitted weatherproof PV connectors, necessary corrosion-resistant mounting clamps and module frame for fixing on existing structure, including all accessories, transportation, handling, installation, interconnection and testing, conforming to applicable BIS standards including IS 14286 (Part 1):2023 / IEC 61215-1:2021 and IS/IEC 61730-1 61730-2, with applicable BIS registration/certification and MNRE/-$LMM^2$ compliance wherever applicable, complete as directed by the Engineer-in-Charge, including minimum 5 years comprehensive product warranty | Each | 394 | |
| 3. | Supplying and erecting DC LED Street light fitting of 12V 60 W including first 6 hr. full intensity light output and following 6 hr. with half intensity light output with lumen 140 lumen/ watt colour temp 6000K -6500K colour redering index 70 $PWM^2$ charge controller efficiency 90% LED driver efficiency 90% Duty cycle first six hours 100% Rest 50% light LED external optics 145X90 degree street light lens class IP 66 charge controlller methodology - three stage battery charge monitoring algorithm maximum charging current 10 -mps short circuit protection battery over charge protections battery deep discharge protection solar panel dusk to dawn operation NTTV-4V DTTV-6V battery low load disconnect voltage 11.2V battery full load disconnect voltage 13V battery constant voltage set point 14.7V LED Indication- green off battery not charging PV low green on battery charging green flashing battery full Red off battery not discharge Red on Battery discharge load disconnect overall dimension- 240mm X 110mm X 40mm overall Weight- 1Kg. and above housing of pressure die cast aluminium alloy and heat sink extruded aluminium complete with all necessary connecting wires as per standards. (IS Standard 16102 Safety Of Luminaire IEC60598-1 2014IEC60598-1 2014 IEC61547) (5 Yrs Fully Cromprensive Warrantee)(Non-CSR) | Each | 394 | |
| 4. | Supplying installing testing and commissioning Of Lifepo4 battery with capacity of 12.8V-78 -h with 4S 15- BMS Cell having duty cycle 3000 suitable to charge lithium cell with necessary wiring connections With IP 65 alluminium cabinet with stand and nut bolts complete. ( Nominal Voltage - 24V Nominal Capacity - 75-h Stored Energy- 1.8Kw Cycle 0.5C 80% DOD 3000 Charge Voltage 29.2 charge mode CCCV Standard charge current- 15 amp rapid charge current- 37.5 standard discharge current- 15 max charge current- 75 amp low voltage cutoff- 21.2 casing material- -lluminium Terminal- MC4 connector charge temp range Discharge temperature range 20-55 C Storage temp - 20-45C Weight - 17Kg and all necessary connecting wires as per standards. (IS Standard IS16046 For Safety IEC 62133-1 2015+-1 2021 IEC 62133-213 2014+-1 2017) (5 Yrs Fully Cromprensive Warrantee)(Non-CSR) | Each | 394 | |

जा.क्र.काअना/ई-निविदा/१३२५/२०२६
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा. बां. विद्युत विभाग, २ रा मजला, ग्रीन बिल्डींग,
सा. बां. परिसर, उंटवाडी रोड, नाशिक - ४२२ ००२.
दिनांक : २५/०८/२०२६

**कार्यकारी अभियंता**
सा. बां. विद्युत विभाग,
नाशिक.

**विमाका/नाशिक/जाहिरात/१६४/२०२६**

# सुवर्णाताई ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त सेवाकार्याचा अनोखा संकल्प; शिरवलीत साड्या, शैक्षणिक साहित्य, शेतीपूरक साहित्य व नेत्रतपासणी शिबिर!












जीवनात आपण किती पैसा कमावला यापेक्षा आपल्या हातून किती चांगले कार्य घडले आणि त्या कार्याचा वेलू गगनावरी कसा जाईल, यासाठी प्रयत्न करणे हीच खरी जीवनातील संपत्ती आहे. आवड असेल तर सवड मिळते आणि सवड मिळाली की अवघड कामही सहज शक्य होते, या विचाराने दुसऱ्याच्या सुखात आपले सुख आणि दुसऱ्याच्या दुःखात त्याच्या पाठीशी उभे राहणाऱ्या सरळगाव, ता. मुरबाड येथील सामाजिक कार्यकर्त्या सुवर्णाताई ठाकरे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत विविध सेवाकार्यांचा अनोखा संकल्प केला. गेल्या सुमारे ३० वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या सुवर्णाताई यांनी कोणतीही जाहिरातबाजी न करता साधेपणाने वाढदिवस साजरा करत समाजोपयोगी उपक्रमांना प्राधान्य दिले. त्यांच्या या कार्यातून महिला वर्गासह समाजातील प्रत्येक घटकाला प्रेरणा मिळत असून, पैसा न कमावता माणसे जोडणे हीच आपली खरी संपत्ती असल्याचे त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले.

गौरी-गणपतीच्या सणाचे औचित्य साधून शिरवली परिसरातील ग्रामस्थांसाठी शेट नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी महिलांना मोफत साड्यांचे वाटप, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, शेतकऱ्यांना शेतीपूरक साहित्य तसेच शाळेसाठी परसबागेकरिता वांगी, मिरची आदी रोपांचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी नवीन संगणक प्रशिक्षण प्रयोगशाळेचे उद्घाटन करण्यात आले. तसेच ग्रामस्थांसाठी मोफत नेत्रतपासणी शिबिर घेण्यात आले. गरजूंना पुढील उपचार व नेत्रशस्त्रक्रियेची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली. या सर्व उपक्रमांमुळे शिरवली परिसरात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण

**डॉ. विश्वासराव आरोटे, कळसुबाई शिखरावरून**

निर्माण झाले. विशेष म्हणजे शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण आणि शेती या चारही क्षेत्रांना स्पर्श करणारे हे उपक्रम ग्रामस्थांसाठी अत्यंत उपयुक्त ठरले.

या कार्यक्रमाला शेट नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला, श्री शक्तीच्या अध्यक्ष तथा मुरबाड तालुक्यातील सामाजिक कार्यकर्त्या सुवर्णाताई ठाकरे, डी.वाय. फाउंडेशनच्या ठाणे जिल्हा महिला अध्यक्षा चारुशीला गायकर, भाजपच्या ठाणे जिल्हा महिला उपाध्यक्ष कल्पना पवार, आरपीआय मुरबाड तालुका अध्यक्ष दिनेश उघडे, मराठा काँग्रेसचे संस्थापक अध्यक्ष उमेश चौधरी, भाजप ओबीसी सेलचे उपाध्यक्ष उमाकांत भोईर, छत्रपती संस्थेचे अध्यक्ष तथा पत्रकार नरेश म्हडसे, माजी सरपंच जगन घागस, तुकाराम घागस, सेवा सोसायटीचे चेअरमन लक्ष्मण शिरोशे, माजी चेअरमन दत्तात्रय कथोरे, सामाजिक कार्यकर्ते दत्तात्रय म्हडस, केंद्रप्रमुख वेखंडे मॅडम, सामाजिक कार्यकर्ते भाऊ हरड, मधुकर जमदरे, ईशान नेत्रालयाचे रोहित झुंजारराव व डॉक्टरांची टीम, आशा सेविका सुवर्णा आगिवले, निशा घागस, कृषी सखी सीमा शिरोसे, बचत गटाच्या प्रमुख सीआरपी दीक्षा आगिवले, ताई सावंत, अंगणवाडी शिक्षिका रेवती हिंदोळा, युवा कार्यकर्ते दिनेश शिरोशे, ग्रामपंचायत कर्मचारी नरेश बांगर, मुख्याध्यापक उबाळे सर, पष्टे मॅडम, वाळुंज मॅडम, बडगुजर मॅडम यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी, महिला, बचत गटातील महिला, अंगणवाडी सेविका व ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन शालेय समिती अध्यक्ष नरेश शिरोशे आणि माजी सरपंच तानाजी पांडुरंग घागस यांनी केले. वाढदिवसानिमित्त सुवर्णाताई ठाकरे यांनी छोटेखानी केक कापून वाढदिवस साजरा केला; मात्र त्यांच्या वाढदिवसाचा खरा आनंद विविध शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक संस्थांना शैक्षणिक व उपयोगी साहित्य देण्यातच दिसून आला. अत्यंत संयमी, नम्र, कुटुंबाची जबाबदारी सांभाळत सामाजिक कार्याची नाळ घट्ट जोडून ठेवणाऱ्या सुवर्णाताई आज अनेकांसाठी आधारवड आणि मायमाऊली ठरल्या आहेत. सुखाच्या क्षणी सर्वजण सोबत असतात; मात्र दुःखाच्या प्रसंगी धावून जाणे, गरजूंच्या मदतीला उभे राहणे आणि कोणताही गाजावाजा न करता सेवा करणे ही त्यांची ओळख निर्माण झाली आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सेवाकार्यामुळे ठाकरे परिवाराचे नाव समाजसेवेच्या माध्यमातून अधिक उजळले असून, 'माणसे जोडणे आणि समाजासाठी जगणे' हा सुवर्णाताईंचा जीवनप्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# भारत विद्यालयात शिक्षक दिन साजरा

## प्रामाणिक शिक्षकांच्या कार्यावरच समाज व्यवस्था टिकून आहे : माजी प्राचार्य जयवंत मेहत्रे

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

प्रामाणिक शिक्षकांच्या कार्यावरच समाज व्यवस्था टिकून आहे. शिक्षकच समाजाचा खरा दिशादर्शक आहे,असे प्रतिपादन माजी प्राचार्य जयवंत मेहत्रे यांनी केले.

भारत विद्यालय मिरजगाव येथे आयोजित शिक्षकदिना च्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. विद्यालयाचे चेअरमन डॉ. रमेश झरकर यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपन्न झाला.या कार्यक्रमाचे औचित्य साधून श्री.मेहत्रे यांनी विद्यालयाच्या ग्रंथालयासाठी पुस्तक रुपी अमूल्य भेट दिली.



याप्रसंगी माजी मुख्याध्यापक देविदास राऊत,पालक वर्ग, शिक्षकदिनी शिक्षकांची भूमिका बजावलेले विद्यार्थी, विद्यालयातील सर्व शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यार्थी शिक्षकांनी दिवस भरामध्ये आलेले अध्यापनाचे अनुभव व्यक्त केले.शिक्षक हा फक्त पुस्तकी ज्ञान देणारा व्यक्ती नसून जीवनाला संपूर्ण आकार देण्यासाठी मार्गदर्शक वाटाड्या आहे,असे विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले.

प्रास्ताविकामध्ये विद्यालयाचे मुख्याध्यापक किशोर खुरंगे यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व विशद करत विद्यालय विद्यार्थी हिताच्या दृष्टीने राबवत असलेल्या उपक्रम ांची माहिती दिली.

माजी मुख्याध्यापक देविदास राऊत यांनी विद्यालयाच्या प्रगती विषयी समाधान व्यक्त करत विद्यालयाच्या प्रगतीमध्ये आपले योगदान देण्याचे मान्य केले.

अध्यक्ष स्थानावरून बोलताना विद्यालयाचे चेअरमन डॉ. रमेश झरकर म्हणाले, आजच्या समाज व्यवस्थेला योग्य दिशा आणि आकार देणारा एकमेव घटक म्हणजे शिक्षक होय.म्हणूनच शिक्षकांची भूमिका फक्त शाळेपुरतीच न राहता सम ाजाचे प्रबोधन करण्याचा भारही शिक्षकांनी घ्यायला हवा.आजच्या विद्यार्थी शिक्षकांचे त्यांच्या कामाबद्दल कौतुक करताना शाळेच्या एकंदरीत प्रगतीबद्दल ही त्यांनी समाधान व्यक्त केले. शिक्षकांनी दिलेल्या ज्ञानामधून विद्यार्थ्यांनी जर आपले आयुष्य घडवले तरच शिक्षक दिन साजरा केल्याचे सार्थकी लागेल.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करणारी आजची विद्यार्थी शिक्षिका कु.ज्ञानेश्वरी नवले हिचे त्यांनी विशेष कौतुक केले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी ज्येष्ठ शिक्षक राजेंद्र नवले, कल्याण गवारे,सतीश फरताडे,अन्सार तांबोळी, गौतम रसाळ,दादा शिंगाडे, विनोद देसाई,साहेबा बोडखे, सौ.वैशाली पिसे,निशा गुंड, स्नेहल ठोंबरे तसेच कर्मचारी संदीप मेरगळ, अमोल बागल,अनिल वतारे आदींसह सर्व शिक्षक व कर्मचारी वर्ग आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# श्रावण मास मुळे गोरक्षनाथ गडावर रोज गर्दी व भंडारा

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

नगर जवळील गर्भगिरी डोंगरा वरील गोरक्षनाथ गड मंदिर व परिसर भविकांबरोबर पावसाळी पर्यटनाला तसेच श्रावण मास शेवटचा श्रावणी रविवार व सोमवार असल्याने लोकांची रोज गर्दी होत आहे,तसेच संपूर्ण श्रावण महिन्यात येथे भाविकांकडुन दररोज भंडारा संपन्न होतो. त्याचा हजारो भाविक महाप्रसाद म्हणून लाभ घेतात.

श्रावण मध्ये येथील डोंगर हजारो भाविकांनी फुलुन जात आहे,तसेच दररोज हजारो भाविक दर्शनासाठी गर्दी करतात. श्रावणात येथे केलेले अन्नदान सर्वांना मिळते अशी श्रद्धा असल्याने हजारो कुटुंब येथे संपूर्ण श्रावण महिन्यात भंडारा करतात नवनाथ भक्तिसार मध्ये या ठिकाणाचे महत्व सांगितले आहे.दररोज दर्शनाला रांगा लागत आहे.

नगरपासून २० किलोमीटर अंतरावर असलेल्या या ठिकाणी पॅराग्लाडींग ,ट्रेकिंग साठी लोक येतात तसेच या ठिकाणी फोटोशूट व सेल्फी अनेक जण करतात,आता येथे रस्ता, लाईट, बगीचा, धर्मशाळा,भोजनगृह आदी सोयी झाल्याने त्याची संख्या वाढत आहे.हे ठिकाणी



नगरचे हिल स्टेशन असून या ठिकाणी पावसाळ्यात धबधबे असतात.माळशेज सारखे वातावरण असते,ढग आपणास चिटकून जात आहे असे दिसते. तर पाऊस पडल्यावर धुके मोठ्या प्रमाणात असते.तर इतर वेळी शुद्ध हवा असते,थंड हवा असल्याने व सभोवेतालचा परिसर विलोभनीय दिसतो.

# अहिल्यानगर जिल्हा बँक निवडणूक ; डॉ. सुजय विखे पाटील स्पष्टच म्हणाले

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

जिल्ह्यातील नेत्यामध्ये माझ्या नावावर सहमती होत नसेल आणि वाद होत असतील, तर मला जिल्हा बँकेच्या पदावर बसण्याची कोणतीही इच्छा नाही, असे स्पष्ट करत डॉ. सुजय विखे यांनी जिल्हा बँक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आपली भूमिका मांडली आहे. तसेच या राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सांगतील तोच अंतिम निर्णय होईल आणि तीच व्यक्ती जिल्हा बँकेत अध्यक्ष होईल. बाकी राहाता, कर्जत-जामखेडसह काँग्रेसच्या नेत्यासह कोणाला काय वाटते याला अर्थ नाही, असे रोखठोक उत्तर डॉ. विखे पाटील यांनी दिले. बॉसने सांगितलं म्हणजे गोष्ट संपली असेही सांगण्यास ते विसरले नाहीत.

रविवारी नगरमध्ये पत्रकारांशी बोलताना त्यांनी पक्षांतर्गत वरिष्ठ नेत्यांच्या निर्णयालाच अंतिम मानणार असल्याचे सांगितले. पत्रकारांशी संवाद साधताना डॉ. विखे म्हणाले, कुठलीही निवडणूक लागली की माझं नाव येतं, पण मला काही मिळत नाही. गेल्या सहा-सात महिन्यांपासून हेच चाललं आहे. विधानसभा लागली तर सुजय विखे आमदारकीला, विधान परिषद लागली तर सुजय विखे आमदारकीला आणि जिल्हा बँक लागली तरी माझंच नाव पुढे येतं. जिल्हा परिषदेत आरक्षण पडलं म्हणून ठीक आहे, नाहीतर तिथेही माझं नाव चालवलं असतं. जिल्हा बँकेचे महत्त्व अधोरेखित करताना ते पुढे म्हणाले, जिल्हा बँक ही शेतकर्यांच्या अस्मितेची आणि जिवाळ्याची संस्था आहे. सहकार क्षेत्रातील लोकांनी ही संस्था चालवणं योग्य राहील, जेणेकरून शेतकर्यांना न्याय मिळेल. आज नॅशनल बँका शेतकर्यांना सहज कर्ज देत नाहीत, पण अहिल्यानगर जिल्हा बँकेने शेतकर्यांना नेहमीच आधार दिला आहे. आपल्या पदाबाबत आणि पक्षाच्या आदेशाबाबत बोलताना ते ठामपणे म्हणाले, या खुर्चीवर तोच बसेल ज्याचे नाव देवेंद्र फडणवीस सांगतील. बाकी कोणाला काय वाटतं याच्याशी मला काही देणं-घेणं नाही. राज्याला मुख्यमंत्री आहेत आणि ते आमचे सर्वेसर्वा आहेत. त्यांनी ज्याचे नाव निश्चित केले, ते काम होणार. बॉसने बोल दिया होने का, तो होने का! आमच्याकडे बाकी विचार करत बसत नाहीत, अशा शब्दांत त्यांनी आपली भूमिका मांडली.

भोसाखिंड बोगदा होण्यासाठी प्रत्येक आमदारांचे श्रेय आहे. यासाठी दक्षिणेतील आमदारांनी आपआपल्या परीने योगदान दिलेले आहे. या बोगद्यासाठी राष्ट्रवादीच्या आमदार यांनी काय प्रयत्न केले. याबाबत आपल्याकडे माहिती नाही. मात्र, ते म्हणत असतील तर त्यांच्याकडे काहीतरी पूरावा असलेच. हा विषय श्रेयवादाचा नाही. राज्यातील सर्व आमदार मुख्यमंत्री यांच्या नेतृत्वाखाली काम करतात. नगर-करमाळा,



नगर शहरातील उड्डाणपूलाचे काम मी मार्गी लावले. मात्र, या कामाच्या श्रेयाचे रुपांतर मतात होते की नाही, हे सांगत येणे कठीण असल्याचे विखे यावेळी म्हणाले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, अॅड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ-१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# माळशेज नागरी पतसंस्थेची २४ वी वार्षिक सभा उत्साहात; ४०० ते ५०० गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव!

















ठाणे/संतोष पडवळ (समर्थ गांवकरी)

**ठाणे :** माळशेज नागरी सहकारी पतसंस्थेची २४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा एन.के.टी. सभागृहात संस्थेचे संस्थापक अध्यक्ष, संत वाययाचे गाढे अभ्यासक ह.भ.प. चंद्रकांत महाराज डुंबरे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. संस्थेच्या वतीने यावेळी सभासदांच्या सुमारे ४०० ते ५०० गुणवंत पाल्यांचा शैक्षणिक साहित्य व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कारामुळे पालक व विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. तसेच वर्षभर संस्थेच्या प्रगतीसाठी परिश्रम घेणाऱ्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना व्यासपीठावर बोलावून त्यांचाही विशेष सन्मान करण्यात आला.

सभेस हिंदुस्थानातील थोर समाजसेवक व दानशूर शेठ नानजीभाई खेमजीभाई ठक्कर ठाणावाला, ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक विशाल कुऱ्हाडे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गावकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, ज्येष्ठ पत्रकार शांताराम तांगटकर, भाजप नेते राजाराम वाघचौरे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे अकोले तालुकाध्यक्ष अशोक उगले, पत्रकार विजय शेळके, माजी सभापती अंजनाताई बोंबले, राजेंद्र पांडे आदी मान्यवर उपस्थित होते. नगर, नाशिक, पुणे, ठाणे व मुंबई परिसरातील सभासद, विविध शाखांच्या समित्यांचे पदाधिकारी, संचालक, अधिकारी, कर्मचारी तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

यावेळी ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदी निवड झाल्याबद्दल विशाल कुऱ्हाडे तसेच महानगर बँकेच्या संचालकपदी निवड झाल्याबद्दल छायाताई वाढवणे यांचा संस्थेच्या वतीने शाल व पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या उपस्थितीत विशेष सन्मान करण्यात आला. जनतेने दिलेल्या संधीचे निश्चितच सोने करून सहकार क्षेत्रात प्रभावी काम करण्याचा निर्धार विशाल कुऱ्हाडे यांनी व्यक्त केला.

सभेस प्रगतिशील शेतकरी प्रकाशशेठ नेहरकर, प्रगतिशील शेतकरी संतोषशेठ नेहरकर, ह.भ.प. नंदाताई सडोके, अंतर्गत हिशोब तपासणीस अतुल अर्जुन दळवी, सनदी लेखापाल प्रशांत कदम, पुण्यनगरी सामाजिक संस्थेचे अध्यक्ष संजय नेहरकर, मूल्यांकनकार राजेश विंचुरकर, ह.भ.प. श्रीरंग महाराज बोऱ्हाडे, हेमंत तांबे, विमा सल्लागार अधिकारी सुहास डावखर, नामदेव ढवळे, शिवाजी महाराज टेमकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. संस्थेच्या उपाध्यक्ष सौ. उषाताई शिंदे, समिती सदस्य केशव मोरे, चिमणाजी वाकचौरे, सोमनाथ आंबरे, गौतम घोसाळे, ठेकेदार रामनाथ थोरात आदींनीही सभेस उपस्थिती लावली.

विविध शाखांच्या समिती अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांनीही सभेला उपस्थित राहून संस्थेच्या कार्याला शुभेच्छा दिल्या. यामध्ये माजीवाडा शाखा समिती अध्यक्ष तथा नगरसेवक अनिल भोर, आळेफाटा शाखा समिती अध्यक्ष ॲड. सुधीर कोकाटे, गणोरे शाखा समिती अध्यक्ष वीरेंद्र थोरात, नारायणगाव शाखा समिती अध्यक्ष तथा विघ्नहर सहकारी संघाचे संचालक बाळासाहेब घुले, मडपारगाव समिती अध्यक्ष बाबासाहेब, समशेरपूर शाखा उपाध्यक्ष सौ. शांताबाई जोरवर,

**▸माळशेज नागरी पतसंस्थेची यशस्वी घोडदौड; वार्षिक सभेत गुणवंत विद्यार्थी व कर्मचाऱ्यांचा सन्मान!**
**▸माळशेज नागरी पतसंस्थेच्या वार्षिक सभेला मान्यवरांची मांदियाळी; विशाल कुऱ्हाडे, छायाताई वाढवणे यांचा विशेष सन्मान!**
**▸सभासदांच्या विश्वासाला यशाची जोड; माळशेज नागरी पतसंस्थेच्या वार्षिक सभेत १०० कोटींचा संकल्प!**
**▸माळशेज नागरी पतसंस्थेची २४ वी वार्षिक सभा उत्साहात; गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव अन् १०० कोटींच्या ठेवींचा संकल्प!**

घाटकोपर शाखाध्यक्ष अंकुश डेरे, बनकर फाटा शाखाध्यक्ष पुनाराम चौधरी, डुंबरवाडी शाखाध्यक्ष भारत डोंगरे, समशेरपूर शाखाध्यक्ष अमित उगले, सुनील शेळके यांच्यासह विविध शाखांचे पदाधिकारी उपस्थित होते.

सभेस संस्थेचे सदस्य संजय सखमा सहाणे, अनिल चंद्रभान काकड, गोविंद नरहरी वेदपाठक, तुकाराम गंगाधर पाटोळे, सुनील जयराम उदमले, यश गणेश शेळके, चंद्रभान गणपत शेळके, शांताराम मुरलीधर जीर्वेकर, बाळासाहेब गंगाधर मोहिते, आनंदा चंद्रभान शेळके, जगन्नाथ मुरलीधर बोडके, जालिंदर चंद्रभान बोडके, श्रीकांत रमेश नेवासकर, सानिध्य श्रीकांत सहाणे, वसंत विठ्ठल सूर्यवंशी यांच्यासह मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते. सभेच्या विविध कामकाजात उपाध्यक्ष धनंजय दांगट, संचालक दिनकर पाचंगे, सुबोध डुंबरे व सौ. स्नेहल नाथ यांनी अहवाल व ठरावांचे वाचन केले. संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नयना डुंबरे यांनी अहवाल सालातील नफा–तोटा पत्रक तसेच संस्थेच्या प्रगतीचा अहवाल सभासदांसमोर सादर केला. संस्थेचे सचिव अरुण राजदेव यांनी इतिवृत्ताचे वाचन केले. सभेस उपस्थित सभासदांचे स्वागत युवा संचालक तथा नामवंत उद्योजक श्रीकांत शेठ सहाणे यांनी केले. प्रास्ताविक ज्येष्ठ संचालक गंगारामशेठ कुऱ्हाडे यांनी केले. सूत्रसंचालन संचालक श्रीकांत सहाणे यांनी केले, तर आभार प्रदर्शन माळशेज नागरी पतसंस्थेच्या कल्याण शाखा समिती अध्यक्ष तथा कॅनव्हिको हेल्थ केअरचे संचालक निलेशशेठ आरोटे यांनी केले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प. चंद्रकांत महाराज डुंबरे यांनी संस्थेच्या प्रगतीमध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगितले. वर्षभर संस्थेच्या कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतल्यामुळे संस्थेची यशस्वी घोडदौड सुरू असल्याचे नमूद करून त्यांच्या कार्याचे अभिनंदन करणारा ठराव सभेत मांडण्यात आला. तसेच सभासद व कर्जदारांच्या हिताच्या दृष्टीने त्यांचा विविध कंपन्यांच्या माध्यमातून विमा उतरविण्याबाबतचा ठरावही मांडण्यात आला. या दोन्ही उपक्रमांना सभासदांनी एकमताने मंजुरी दिली.

ज्येष्ठ पत्रकार शांताराम तांगटकर यांनी यावेळी ह.भ.प. चंद्रकांत महाराज डुंबरे यांच्या संघर्षमय जीवनप्रवासाचे कौतुक केले. शेतकरी कुटुंबातून पुढे येत नायब तहसीलदार पदापर्यंतचा संघर्षमय प्रवास करणारे डुंबरे महाराज हे सहकार क्षेत्रातील दीपस्तंभ असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. त्यांच्या नेतृत्वाखाली उभारलेली माळशेज नागरी सहकारी पतसंस्था भविष्यात संपूर्ण महाराष्ट्रात विस्तारावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

दानशूर शेठ नानजीभाई ठक्कर ठाणावाला यांनी ह.भ.प. चंद्रकांत महाराज डुंबरे हे सद्गुण व मांगल्याचा अनमोल ठेवा असून त्यांच्या नेतृत्वाखाली संस्था सातत्याने यशाकडे वाटचाल करीत असल्याचे सांगितले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गावकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी माळशेज नागरी पतसंस्थेची अकोले येथे शाखा सुरू झाल्यास अकोले व परिसरातील नागरिकांना मोठी सुविधा उपलब्ध होईल, असे मत व्यक्त केले.

संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नयना डुंबरे यांनी अहवाल सालातील आर्थिक स्थिती, नफा–तोटा पत्रक आणि संस्थेच्या विविध उपक्रमांचा आढावा सभेसमोर मांडला. संस्थेने आतापर्यंत केलेल्या प्रगतीची माहिती देताना आगामी काळातही सभासदकेंद्रित धोरणातून विविध योजना राबविण्याचा मानस व्यक्त करण्यात आला. पुढील वर्षी संस्थेच्या ठेवींचे १०० कोटी रुपयांचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला. तसेच सभासद व कर्जदारांच्या आर्थिक सुरक्षिततेसाठी विविध कंपन्यांच्या माध्यमातून विमा संरक्षण देण्याच्या उपक्रमावरही भर देण्यात आला.

माळशेज नागरी सहकारी पतसंस्था ही केवळ आर्थिक व्यवहार करणारी संस्था नसून सभासदांच्या सुख–दुःखात सहभागी होणारी मातृसंस्था म्हणून कार्यरत असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. सभासदांच्या आर्थिक प्रगतीबरोबरच त्यांच्या कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला प्रोत्साहन देण्यासाठी गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्याची परंपरा संस्थेने जपली आहे. त्यामुळे संस्थेच्या या उपक्रमाचे उपस्थित पालक, विद्यार्थी व सभासदांनी विशेष कौतुक केले.

वार्षिक सर्वसाधारण सभा यशस्वी करण्यासाठी संस्थेचे उपाध्यक्ष धनंजय दांगट, गुरुदयालसिंग शेठ धनोत्रा, सचिव अरुण राजदेव, संचालक दिनकर पाचंगे, गंगाराम कुऱ्हाडे, प्रवीण ठोंबरे, श्रीकांत सहाणे, अनिल ठोंबरे, सुबोध ठोंबरे, स्नेहल नाथ, विजय कुरकुटे, अविनाश सावंत, रत्ना इंगळे, चैतन्या काळखैर, परशुराम सडाके तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी नयना डुंबरे यांनी विशेष परिश्रम घेतले. संस्थेच्या सर्व शाखांचे शाखाधिकारी, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सभेच्या यशस्वी आयोजनासाठी उत्तम नियोजन केले. संस्थेच्या २४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या निमित्ताने मोठ्या संख्येने सभासद, पालक, विद्यार्थी, शाखा पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर एकत्र आले. गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान, कर्मचाऱ्यांचा गौरव, नवनिर्वाचित बँक संचालकांचा सत्कार तसेच संस्थेच्या आगामी वाटचालीबाबत व्यक्त करण्यात आलेला १०० कोटी रुपयांच्या ठेवींचा संकल्प यामुळे ही वार्षिक सभा विशेष ठरली.